# नियमित दिवाणी दावा क्र.६२/२०११ मधील
# निशाणी १३१, १३३ व १३५ खाली एकत्रीत आदेश
## CNR No. MHRT050005392011

०१. प्रस्तुतचे विचाराधीन अर्ज वादीने प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१७ विरुद्ध झालेला अबेटमेंट रद्द करणेकरीता, प्रतिवादी क्र.१७ चे वारस अभिलेखावर आणण्यास झालेला विलंब माफ होवून व प्रतिवादी क्र.१७ चे वारस दाव्यात समाविष्ठ करण्याची परवानगी मिळण्याबाबत सादर केले आहेत.

०२. वादीचे अर्जातील असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१७ अन्वर इब्राहिम खतीब हे दि.१७.०१.२०२२ रोजी मयत झाले आहेत. वादी हे आपल्या मुलांकडे भाईंदर मुंबई येथे वास्तव्यास होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १७ हे मयत झाल्याबाबत वादीला समजले नाही व ज्यावेळी सदर बाब त्यांना समजली त्यानंतर त्यांनी प्रतिवादी क्र. १७ चे वारस कोण आहेत याचा शोध घेणे सुरु केला. वादी हे वयोवृध्द असल्याने त्यांना जास्त प्रवास करणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना मयत प्रतिवादी क्र.१७ च्या वारसांची माहिती घेण्यास विलंब झाला. वादीचे असे कथन आहे की, सदर विलंब होण्यामागे त्याची कोणतीही चुकी किंवा निष्काळजीपणा नाही. वादीचे असेही म्हणणे आहे की, झालेला विलंब माफ न झाल्यास व प्रतिवादी क्र.१७ च्या वारसांना दाव्यात समाविष्ठ करून न घेतल्यास त्याचे न भरुन निघणारे नुकसान होईल.

०३. प्रतिवादीच्या वकीलांनी प्रस्तुत तिन्ही अर्जांवर म्हणणे दिले व असे कथन केले आहे की, सदर अर्जांमध्ये कोणतेही संयुक्तीक कारण नमुद नाही त्यामुळे सदर अर्ज हे फेटाळण्यात यावेत किंवा सदर अर्ज मंजूर करण्याचे न्यायालयाचे मत झाल्यास त्यावर जास्तीत जास्त कॉस्ट लावून मंजूर करण्यात यावेत.

०४. वादीच्या म्हणण्याप्रमाणे तो त्याच्या मुलांकडे भाईंदर मुंबई येथे वास्तव्यास होता त्यामुळे प्रतिवादी क्र.१७ हे मयत झाल्याचे त्याला समजले नाही. या अनुषंगाने

पाहिल्यास प्रस्तुतचा दावा हा वादीने वाटपाकरीता दाखल केलेला आहे त्यामुळे सहाजिकच सर्व प्रतिवादी हे वादीचे नातेवाईक आहेत. वादी व प्रतिवादी क्र. १७ तसेच इतरही काही प्रतिवादी हे तिसे गावी राहतात असे वादपत्रावरून दिसून येते. वादी हा त्यांच्या मुलांकडे मुंबई येथे वास्तव्यास होता ही बाब वादीने न्यायालयाला कळविले नाही. अशा परिस्थितीत वादीने दिलेले कारण संयुक्तीक नसल्याने दिसून येते. असे असले तरीही प्रतिवादी क्र. १७ हे मयत झाले आहेत त्यामुळे त्याच्या येणा–या हिश्शांमध्ये त्याच्या वारसांचा निश्चितच अधिकार राहतो. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता असल्यामुळे प्रतिवादी क्र.१७ चे वारस हे आवश्यक पक्ष आहेत. एकंदरीत, सर्व वादीच्या कथनांचा विचार करता प्रस्तुतचे तिन्ही अर्ज हे मंजूर करण्यालायक आहेत परंतु वादीकडून झालेल्या विलंबाबाबत योग्य कॉस्ट लावून मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज नि.क्र. १३१, १३३ व १३५ मंजूर करण्यात येतात.

२. वादीने प्रतिवादी क्र.१७ चे वारस दाव्यात समाविष्ठ करावेत व त्याची पुर्तता तात्काळ करावी.

३. वादीने झालेल्या विलंबाबाबत रु.१,०००/– कॉस्ट जमा करावी.

४. वादीने कॉस्टची रक्कम जमा केल्यावर ती जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात यावी.

SANJAY MOTIRAM CHAVAN
Digitally signed by SANJAY MOTIRAM CHAVAN
Date: 2023.06.28 17:56:50 +0530

दिनांक – २८.०६.२०२३

(संजय मो. चव्हाण)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,
ता. खेड, जि. रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order below Exh.131, 133 & 135 in Case No. | : | RCS No. 62/2011 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 28.06.2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 28.06.2023 |
| Judgment/Order uploaded on | : | 28.06.2023 |